# निशाणी क्र.१ वरील आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन, अनुसार वारसा दाखला (Heirship Certificate) मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार असे कथन करते की, मयत आशा शामरावजी भगत हिचा दिनांक ११/०६/२०२५ रोजी मौजा दिग्रज, ता. सेलू, जि. वर्धा येथे आजारपणामुळे नैसर्गिक मृत्यू झाला. अर्जदार ही मयताची सख्खी बहीण आहे. मयत आशा हिचे पती शामरावजी भगत यांचा मृत्यू पूर्वीच दिनांक ३१/०५/१९९६ रोजी झालेला आहे आणि मयत व तिचे पती हे दोघेही निःसंतान होते. त्यामुळे अर्जदार ही मयत आशा शामरावजी भगत हिची एकमेव हयात कायदेशीर वारस आहे. मयताच्या नावे मौजा दिग्रज, ता. सेलू येथे घर क्र. १६४ ही स्थावर मालमत्ता असून, अर्जदार ही मयताची वारस म्हणून फेरफार नोंदी करिता तलाठी कार्यालयात गेली असता तेथील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र सादर करावे असे सांगितले. त्यामुळे मयताच्या स्थावर मालमत्तेचा वारसा हक्काने लाभ मिळणेकरिता तसेच भविष्यातील इतर शासकीय व निमशासकीय कामकाजाकरिता वारसा आधारे अर्जदाराच्या नावाची नोंद व्हावी याकरिता वारसा दाखला मिळावा म्हणून तिने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर आक्षेप मागविण्याकरिता या अर्जा बाबतचा जाहिरनामा दिनांक ०२/०४/२०२६ या तारखेच्या दैनिक 'पुण्यनगरी' या वर्तमानपत्रात प्रसिद्धीस देण्यात आला. तसेच सदर जाहिरनाम्यास इतर अन्य आवश्यक ठिकाणी म्हणजेच न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच ग्राम पंचायत, दिग्रज, ता. सेलू यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देऊन त्या बाबतचा बेलिफचा अहवाल दिनांक २५/०३/२०२६ दाखल करून घेण्यात आला. यानंतरही आजअखेर प्रस्तुत अर्जाबाबत कोणाचाही कसलाही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

४. मयत आशा शामरावजी भगत हिचा मृत्यू दाखला निशाणी १० वर दाखल असून त्याआधारे हे स्पष्ट होते की मयत आशा हिचा मृत्यू दिनांक ११/०६/२०२५ रोजी ग्रामपंचायत दिग्रज हद्दीत झालेला आहे. तसेच मयताचे पती शामराव भगत यांचा मृत्यू दाखला निशाणी ११ वर दाखल असून त्याआधारे हे स्पष्ट होते की मयतापूर्वीच तिचे पती दिनांक ३१/०५/१९९६ रोजी मरण पावले आहेत. अर्जदाराने निशाणी ९ वर शपथपत्र दाखल करून अर्जातील कथनांना पुष्टी दिली आहे. तसेच अर्जदाराने स्वतः साक्षीदार म्हणून शपथेवर साक्ष देऊन अर्जातील मजकुराची शाबिती केली आहे. अर्जदाराचे आधार कार्ड (निशाणी १२), मकान कर पावती (निशाणी १४) तसेच पोलीस पाटील, दिग्रज यांनी दिलेला वारसान प्रमाणपत्राचा अहवाल (निशाणी १३) पुराव्यावर दाखल आहेत. पोलीस पाटील यांच्या अहवालावरून हे स्पष्ट होते की मयत आशा शामरावजी भगत हिचे पती पूर्वीच मरण पावलेले असून, मयत व तिचे पती निःसंतान होते आणि अर्जदार ही मयताची एकुलती एक वारस आहे. मयत आशा हिचे अर्जदाराशी असलेले नातेसंबंध विचारात घेता हे स्पष्ट

होते की, अर्जदार ही मयत आशा शामरावजी भगत हिची कायदेशीर वारस आहे. हिंदू वारसा अधिनियम, १९५६ चे कलम १५ अन्वये मयत हिंदू स्त्री ही निःसंतान असून तिचे पती पूर्वीच मरण पावलेले असल्याने तिच्या मालमत्तेचा वारसा वडिलांच्या वारसांकडे (heirs of the father) जातो आणि सख्खी बहीण ही या प्रवर्गातील जवळची नातेवाईक आहे. बॉम्बे रेग्युलेशन या कायद्या आधारे स्थावर अथवा जंगम मालमत्तेचा वारसा हक्क ठरविता येत नाही. सदर कायद्याखाली मयत व्यक्तीचे वारस कोण आहेत एवढेच औपचारिकपणे पाहिले जाते. सबब याकामीही मयत आशा हिच्या स्थावर किंवा जंगम मालमत्तेचा वारसा आधारे मालकी हक्क ठरविलेला नाही. परंतु मयत आशा शामरावजी भगत हिची अर्जदार पंचफुला कवडुजी बटाले ही कायदेशीर वारस आहे एवढ्यापुरता वारसा दाखला देता येतो. सबब तेवढ्यापुरताच अंतिमतः मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर केला.

२. अर्जदार सौ. पंचफुला कवडुजी बटाले ही मयत आशा शामरावजी भगत हिची कायदेशीर वारस असल्याने त्यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन या कायद्यानुसार वारसा दाखला (Heirship Certificate) द्यावा.

३. सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ परिच्छेद ३०७ नुसार आवश्यक कोर्ट फी ची पूर्तता करून घ्यावी.

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.08 17:06:35 +0530

**दिनांक** : ०८/०५/२०२६

**(एस. आर. सातभाई)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
सेलू.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)